महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी पालघर यांचे कार्यालय

जिल्हा मुख्यालय पालघर, पालघर बोईसर रोड, कोळगांव, ता. जि. पालघर

दुरध्वनी .क्र.०२५२५-२५३१११ Email ID - collectorpalghar@gmail.com

क्र/महसूल/क-१/टे-३/जमीन मागणी/नवी मुंबई/कावि-१६०९/२०२१ दिनांक :- २७/१२/२०२१

प्रति,
मा.अपर मुख्य सचिव,
महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई
(मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग
यांचे मार्फत सविनय सादर)

**विषय :-** नवी मुंबई महानगरपालीका क्षेत्रांतर्गत घणसोली येथील पामबीच मार्गावर घणसोली ते ऐरोली खाडीवरील ब्रीज प्रस्तावीत असून सदर प्रकल्पामध्ये बाधीत होत असलेल्या ४.०१२२ हेक्टर वन जमीनीच्या बदल्यात वन विभागास पर्यायी वनेत्तर शासकीय जमिन उपलब्ध करुन देण्याबाबत...

**संदर्भ :-** आयुक्त, नवी मुंबई महानगरपालीका यांच्याकडील पत्र जा.क्र. नमुंमपा/श.अ/८६८३/२०२१ दिनांक १०/१२/२०२१

वरील विषयाच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यांत येते की, नवी मुंबई महानगरपालीका क्षेत्रांतर्गत घणसोली येथील पामबीच मार्गावर घणसोली ते ऐरोली खाडीवरील ब्रीज प्रस्तावीत असून सदर प्रकल्पामध्ये बाधीत होत असलेल्या ४.०१२२ हेक्टर वन जमीनीच्या बदल्यात वन विभागास पर्यायी वनेत्तर शासकीय जमिन उपलब्ध करुन देण्याबाबत आयुक्त, नवी मुंबई महानगरपालीका यांनी संदर्भातील पत्रान्वये कळविलेले आहे.

उक्त पत्राच्या अनुषंगाने शासकीय जमीन उपलब्ध करुन देण्याकामी जागा उपलब्धतेबाबत प्रस्ताव सादर करण्याबाबत तहसिलदार डहाणू यांना या कार्यालयाकडील दिनांक १३/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले होते.

अ) तहसिलदार डहाणू यांनी डहाणू तालुक्यातील **मौजे- सरावली** येथील ग.नं ९६/२१ एकूण क्षेत्र ७८.१९.३१ मधील ४.०१२२ हेक्टर क्षेत्र उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

(i) मौजे- सरावली ता.डहाणू येथील ग.नं ९६/२१ एकूण क्षेत्र ७८-१९-३१ हे.आर या जमीनीपैकी ६२.७२.९६ हे.आर क्षेत्रावर खांजण व १५.४६.३५ हे.आर क्षेत्रावर राखीव वन अशी नोंद आहे.

**(ii)** वरील जमीनीच्या इतर हक्क सदरात खालील प्रमाणे जमीनी भाडेपट्टयाने/ संपादनाने देण्यांत आलेल्या असल्याबाबतच्या नोंदी आहेत.

| अ.क्र | तपशिल | क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| i) | रानशेत विभाग आदिवासी सोसायटी यांना मिठागरासाठी २५ वर्षाच्या लीजवर. | ४६.००.० |
| ii) | श्री.रामा झेपरु माच्छी यांस कोळंबी प्रकल्प भाडेपट्टयाने | ५.००.० |
| iii) | श्री.राकेश जयंतीलाल डहाणूवाला यांना कोळंबी प्रकल्पासाठी भाडेपट्टयाने | ५.००.० |
| iv) | श्री.काशीनाथ झेपरु माच्छी यांना कोळंबी प्रकल्पासाठी भाडेपट्टयाने | ५.००.० |
| v) | श्रीम.बेबी अशोक बारी यांना कोळंबी प्रकल्पासाठी भाडेपट्टयाने | ५.००.० |
| vi) | डेडीकेटेड फ्रेड कॉरीडोरकरीता संपादीत | ४.३९.३ |
| | **एकूण भाडेपट्टयाने/ संपादनाने दिलेल्या जमीनी** | **७०.३९.३** |

**iii)** रानशेत विभाग आदिवासी सोसायटी यांना सन १९८९ मध्ये मिठागरासाठी २५ वर्षाच्या लीजवर ४६ हेक्टर जमीन देण्यांत आलेली होती. सदर भाडेपट्टयाची मुदत सन २०१४ मध्ये संपलेली असून मूदत वाढीसाठी त्यांनी अर्ज केलेला नाही. प्रकरणी जमीनीचा वापर केला नसल्याने शर्तभंग झालेला असुन सदर जमीन शासन जमा करण्याबाबत सहाय्यक जिल्हाधिकारी डहाणू यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे.

v) उक्त मिठागराला देण्यांत आलेली जमीन शासन जमा केल्यानंतर त्यातील ४.०१.२२ हे.आर क्षेत्र नवी मुंबई महानगरपालीका यांना मागणी प्रयोजनार्थ उपलब्ध करुन देता येईल.

**ब)** तहसिलदार डहाणू यांनी वरील जमीनीव्यतीरीक्त डहाणू तालुक्यातील मौजे- आंबेवाडी येथील ग.नं २०/१/१ एकूण क्षेत्र ८.३९.० हे.आर मधील ४.००.० हेक्टर क्षेत्र उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने त्यांच्याकडील पत्र जा.क्र.महसूल/टे-१/जमिनबाब/कावि-१५५३/२०२१ दिनांक २२/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

i) मौजे- आंबेवाडी ता.डहाणू येथील ग.नं २०/१/१ एकूण क्षेत्र ८.३९.० हे.आर या जमीनीचे भोगवटादार सदरात खांजण अशी नोंद आहे.

ii) वरील जमीनीच्या इतर हक्क सदरात खालील प्रमाणे जमीनी भाडेपट्टयाने देण्यांत आलेल्या असल्याबाबतच्या नोंदी आहेत.

| अ.क्र | तपशिल | क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| i) | श्री.विनय श्रीपत कीर यांना कोळंबी संवर्धनासाठी ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने (आदेश दिनांक ३०/०४/२००२) | ४.००.० |
| ii) | श्री. कैलास अनंत चामरे यांना कोळंबी संवर्धनासाठी ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने (आदेश दिनांक ३०/०४/२००२) | ०.३९.० |
| | **एकूण भाडेपट्टयाने दिलेल्या जमीनी** | **४.३९.०** |

वरील जमीनीमधील ४.००.० हे.आर जमीन निर्बाध्यरीत्या वाटपास उपलब्ध आहे.

पालघर जिल्हयांतर्गत डहाणू तालुक्यातील दोन गांवांतील (वर नमूद अ व ब) जमीनीच्या उपलब्धतेच्या अनुषंगाने वस्तुस्थिती सादर करण्यांत येत आहे. नवी मुंबई महानगरपालीका क्षेत्रांतर्गत घणसोली येथील पामबीच मार्गावर घणसोली ते ऐरोली खाडीवरील ब्रीज प्रस्तावीत असून सदर प्रकल्पामध्ये बाधीत होत असलेल्या ४.०१२२ हेक्टर वन जमीनीच्या बदल्यात वन विभागास पर्यायी वनेत्तर शासकीय जमिन उपलब्ध करुन देण्याबाबत पुढील आदेश होण्यास विनंती आहे.

**सही XXX**
**(डॉ माणिक गुरसळ)**
**जिल्हाधिकारी पालघर**

प्रत :- मा.प्रधान सचिव, वन विभाग यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत :- आयुक्त, नवी मुंबई महानगरपालीका यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.

(डॉ माणिक गुरसळ)
जिल्हाधिकारी पालघर